# साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे

साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५

020-25538041/42/43/44 commsugar.tech@gmail.com


जा.क्र.साआ/कक्ष-13/ नियोजित साखर कारखाने/परिपत्रक/3266 /2022 दि. 05 /12/2022

**नियोजित साखर कारखाने / इथेनॉल प्रकल्प सुरु करण्यासाठी अंतरचे प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी सादर करावयाच्या प्रस्तावाबाबत.**

## -: परिपत्रक :-

विषय -: नियोजित साखर कारखान्याकरीता आवश्यक असणारे हवाई अंतर प्रमाणपत्र ( Aerial Distance Certificate) मागणीच्या अर्जाबाबत / प्रस्तावाबाबत मार्गदर्शक सूचना.

संदर्भ -: 1. ऊस नियंत्रण आदेश 1966 मधील कलम 6 अ व 6 ब मधील तरतूदी

2. राज्य शासनाचे दि.03/12/2011 रोजीची अधिसूचना.

3. मुख्य संचालक, साखर नवी दिल्ली यांचेकडील दि.10/04/2012 रोजीचे पत्र.

राज्यात मोठया प्रमाणावर ऊसाची लागवड होऊन ऊस उत्पादनात वाढ होत आहे त्यामूळे उपलब्ध ऊसाचे विहीत कालावधीत गाळप होण्याकरीता उद्योजकांकडून साखर कारखाना उभारणीचा कल दिसून येत आहे. तसेच केंद्र सरकारने राष्ट्रीय बायोफ्युएल धोरण -2018 जाहीर केलेले आहे. या धोरणा अंतर्गत राज्यात इथेनॉल प्रकल्प उभारणी करण्याकरीता मोठया प्रमाणावर उद्योजकांकडून मागणी होत आहे.

ऊस नियंत्रण आदेश 1966 चे कलम 6 अ मधील तरतूदीनुसार राज्य शासनाने संदर्भ क्र.2 च्या अधिसूचनेव्दारे राज्यातील नियोजित साखर कारखाना व अस्तित्वातील साखर कारखान्यांच्या अंतराची मर्यादा 25 कि.मी. निश्चित केली आहे .

केंद्र शासनाने ऊस नियंत्रण आदेश 1966 मध्ये सुधारणा करुन ऊसाच्या रसापासून, साखरेपासून किंवा ऊसाच्या सिरपपासून इथेनॉल उत्पादनाची परवानगी फक्त साखर कारखान्यांना दिली आहे. नियोजित साखर कारखाना उभारणी करणेकरीता किंवा ऊस गाळप करुन ऊसाच्या रसापासून, साखरेपासून किंवा ऊसाच्या सिरपपासून इथेनॉल प्रकल्प स्थापित करताना दोन कारखान्यांमधील प्रकल्पामधील अंतर 25 कि.मी. त्रिज्येच्या बाहेर असणे आवश्यक आहे. त्यामूळे अशा कारखान्यांना / प्रकल्पांना उपरोक्त नमूद अंतराची अट लागू होते.

उक्त आदेशातील कलम 6 ब नुसार नवीन साखर कारखान्याकरीता केंद्र शासनाकडे IEM (Industrial Entrepreneur Memorandum ) करीता अर्ज करण्यापूर्वी राज्यातील नियोजित साखर कारखाने / इथेनॉल प्रकल्प यांच्या इच्छुक प्रवर्तकानी साखर आयुक्त यांचेकडून अंतर प्रमाणपत्र (Distance Certificate) प्राप्त करुन घेणे बंधनकारक करण्यात आले आहे . त्यासंदर्भात केंद्र शासनाने दि.10/04/2012 रोजी मार्गदर्शक सूचना निर्गमित करुन हवाई अंतर प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरीता अंवलबावयाची कार्यपध्दती निश्चित केली असून ती खालील प्रमाणे आहे.

1. उद्योजकाने नियोजित साखर कारखाना स्थापनेचा प्रस्ताव हा ऊस आयुक्त / साखर संचालक / विनिर्दिष्ठ अधिकारी यांचेकडेच सादर करावा. असा प्रस्ताव सादर करताना नियोजित कारखान्याच्या चिमणीचे स्थान कुठे असेल हे दर्शवावे.
2. ऊस आयुक्त / साखर संचालक / विनिर्दिष्ठ अधिकारी हे नियोजित साखर कारखान्यांच्या व अस्तीत्वातील साखर कारखान्यांच्या चिमणीचे स्थान तपासून घेईल.
3. प्रस्तावामध्ये नियोजित केलेल्या कारखान्याच्या शेजारील अस्तित्वात असलेला साखर कारखाना / इतर नवीन साखर कारखाना वगळण्यात आला नाही याची खात्री करेल.
4. उपरोक्त बाबींची खात्री झाल्यानंतर ऊस आयुक्त / साखर संचालक / विनिर्दिष्ठ अधिकारी सर्व्हे ऑफ इंडिया यांना अंतर प्रमाणपत्र मिळणेबाबत प्रस्ताव सादर करेल.

केंद्र शासनाच्या उपरोक्त मार्गदर्शक सूचना विचारात घेवून हवाई अंतराचे प्रमाणपत्राबाबत खालील प्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहेत.

**(अ) नियोजित कारखान्याच्या / इथेनॉल प्रकल्पाच्या प्रर्वतकाने पूर्तता करावयाच्या बाबी.**

1. अर्जदाराने सोबत जोडलेल्या विहीत नमून्यात साखर आयुक्त कार्यालयास प्रस्ताव सादर करावा.
2. अर्जासोबत अर्जदाराने द्यावयाची आवश्यक कागदपत्रे.

i) कंपनी / भागीदारी फर्म यांचे नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.
ii) प्रस्ताव सादर करण्यास अर्जदारास प्राधिकृत केलेल्या ठरावाची प्रत.
iii) कंपनीच्या नावे जमिन खरेदी नसेल तर मालकासोबत केलेले नोटराईज्ड करारपत्र.
iv) कंपनी / फर्म यांच्या नावे जमिन असेल तर नियोजित स्थळ दर्शविणा-या जमिनीचा 7/12 उतारा.
v) कंपनीचे आर्टीकल ऑफ असोसिएशन, मेमोरेंडम ऑफ असोसिएशन, भागीदारी फर्म असल्यास भागीदारी करार
vi) नियोजित कारखाना स्थळावर ज्या ठिकाणी चिमणी उभारावयाची आहे तेथील खांबावर गावाचे नाव, सर्व्हे क्रमांक, गट क्रमांक दर्शविलेला फोटो जोडावा.
vii) प्रपत्र ब मध्ये आवश्यक ती माहिती भरुन प्रस्तावासोबत जोडावी.

उपरोक्त प्रमाणे सर्व माहिती व आवश्यक ती कागदपत्रे , दस्तऐवजासह दोन प्रतीत प्रस्ताव सादर करावा.

**(ब) उपरोक्त प्रस्तावाची छाननी करुन प्रस्ताव परिपूर्ण असल्यास या कार्यालयाकडून सर्व्हे ऑफ इंडिया यांना नियोजित साखर कारखाना / इथेनॉल प्रकल्प यांचे हवाई अंतराबाबत दाखला निर्गमित करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येईल.**

**(क) सर्व्हे ऑफ इंडियाकडून हवाई अंतर प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर या कार्यालयाकडून पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.**

i) या कार्यालयाकडून प्रमुख वर्तमान पत्रात हरकती बाबत नोटीस प्रसिध्द करण्यात येईल. सदर नोटीसीचा खर्च अर्जदाराने करावयाचा आहे.
ii) सदरची नोटीस नियोजित कारखाना /इथेनॉल प्रकल्प ज्या भागात आहे तेथील जास्त खप असणा-या एक इंग्रजी व एक स्थानिक भाषेत प्रसिध्द होणा-या दैनिकात दिले जाईल.
iii) नियोजित साखर कारखाना / इथेनॉल प्रकल्प 25 कि.मी. हवाई अंतराच्या आत असल्यास त्यासंबंधी हरकती मागविण्यात येतील.
iv) कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास मा.चिफ डायरेक्टर ऑफ शुगर,नवी दिल्ली यांना सर्व्हे ऑफ इंडिया यांचेकडून प्राप्त झालेल्या अंतराच्या दाखल्यावरुन प्रमाणपत्र दिले जाईल.

v) नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहीत मुदतीत, विहीत पध्दतीने हरकत प्राप्त झाल्यास साखर आयुक्त सर्व संबंधितांची सुनावणी घेऊन आलेल्या हरकतीवर प्रमाणपत्राबाबत गुणवत्तेवर निर्णय घेतील.

तरी यापूढे नियोजित साखर कारखाना / इथेनॉल प्रकल्प स्थापित करु इच्छिणा-या प्रवर्तकांनी या परिपत्रकात नमूद केलेल्या बाबींची पूर्तता करावी.

**सोबत : प्रपत्र "अ" व "ब"**

(शेखर गायकवाड)
आयुक्त, साखर
महाराष्ट्र राज्य,पुणे

प्रत :

1. मा. अपर मुख्य सचिव, (सहकार,पणन ) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
2. प्रादेशिक सहसंचालक (साखर) (सर्व)
3. विशेष लेखा परीक्षक (साखर) सहकारी संस्था, (सर्व)

# प्रपत्र " अ "

( नियोजित साखर कारखान्याच्या / इथेनॉल प्रकल्पाच्या प्रवर्तकांनी साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचेकडे अंतर प्रमाणपत्र ( Distance Certificate) मिळणेकामी करावयाच्या अर्जाचा नमूना )

प्रति,
मा.साखर आयुक्त,
महाराष्ट्र राज्य,
साखर संकुल शिवाजीनगर,
पुणे -411005
(मार्फत प्रादेशिक सहसंचालक (साखर) -----------)

**विषय -: ------------------ या नियोजित कारखान्यास / इथेनॉल प्रकल्पास केंद्र शासनाकडून IEM प्राप्त करण्याकरीता अंतर प्रमाणपत्र मिळणेबाबत.**

संदर्भ-: 1. ऊस नियंत्रण आदेश 1966 मधील कलम 6 अ व 6 ब मधील तरतूदी .
2. राज्य शासनाचे दि.03/12/2011 रोजीची अधिसूचना
3. आपल्या कार्यालयाचे दि.---------------- रोजीचे परिपत्रक.

**महोदय,**

आमच्या ----------------------- या फर्मला / कंपनीने केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या धोरणानुसार नियोजित साखर कारखाना/ इथेनॉल प्रकल्प स्थापन करण्याचे ठरविले असून नियोजित कारखान्याचे स्थळ व मौजे----------, ता.--------- जि.----------- हे प्रस्तावित केले असून त्या जागेकरीता / स्थळाकरीता ऊस नियंत्रण आदेश 1966 मधील कलम 6 अ व 6 ब मधील तरतूदी व राज्य शासनाच्या दि.03/12/2011 रोजीच्या अधिसूचनेनुसार नियोजित कारखान्याच्या स्थळाकरीता केंद्रशासनाकडे IEMमिळणे करीता अर्ज करण्यापूर्वी आपले कार्यालयाचे अंतर प्रमाणपत्र (Distance Certificate) मिळणे आवश्यक आहे त्याअनुषंगाने संदर्भ क्रं.3 च्या परिपत्रकातील प्रपत्र ब मध्ये नमूद केल्यानुसार आवश्यक ती सर्व कागदपत्रे या अर्जासोबत सादर करीत आहोत.

आमच्या कारखान्याच्या नियोजित स्थळाच्या 25 कि.मी. त्रिज्येमध्ये एकही अस्तित्वावतील साखर कारखाना नाही तसेच ऊस नियंत्रण आदेश 1966 मधील कलम 6 अ मध्ये नमूद नवीन साखर कारखाना अस्तित्वात नाही तरी आपणांस विनंती करण्यात येते की, आमच्या अर्जास अनुसरुन नियोजित ---------------- कारखान्याच्या मौजे----------, ता.--------- जि.----------- हे स्थळ केंद्र शासन व राज्य शासनाच्या संदर्भीय 1 व 2 आदेश / अधिसूचनांचे हे पूर्तता करीत असल्याने तसेच प्रमाणपत्र आमचे नियोजित कारखान्यास मिळावे, ही विनंती

सही /-
**अर्जदाराचे / प्रवर्तकाचे नाव -**

## .प्रपत्र " ब "

## नियोजित कारखान्याच्या / इथेनॉल प्रकल्पाच्या अर्जासोबत सादर करावयाची माहिती / कागदपत्रांची सूची

<table>
<tr><th>अ.क्रं.</th><th>तपशील</th><th>माहिती</th></tr>
<tr><td>1</td><td>अर्जदार कंपनी / फर्मचे नांव व पत्ता व ई-मेल आयडी -</td><td></td></tr>
<tr><td>2</td><td>कंपनी फर्म प्रकार (लिमिटेड/ प्रा.लिमिटेड/ भागीदारी / LLP)</td><td></td></tr>
<tr><td>3</td><td>कंपनी / फर्मचा तपशील —<br><br>नोंदणी क्रमांक व दिनांक ---<br>(नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडावी.)</td><td></td></tr>
<tr><td>4</td><td>अर्जदार कंपनी / फर्मचे संचालक / भागीदार / LLP यांचेबाबत माहिती.</td><td>
<table>
<tr><th>संचालक/ भागीदाराचे नाव</th><th>पत्रव्यवहाराचा पत्ता व भ्रमणध्वनी क्र.</th><th>ई-मेल आयडी</th><th>आधार क्रमांक</th><th>पॅन कार्ड क्रमांक</th></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>5</td><td>कारखान्याच्या / प्रकल्पाच्या / नियोजित जागेचा / स्थळाचा तपशिल. (आवश्यक त्या ठिकाणी कागदपत्रे जोडावीत)</td><td></td></tr>
<tr><td></td><td>1.<br>2. जमीन मालकाचे नाव<br>3. नियोजित जमिन असलेल्या गावाचे, तातुक्याचे व जिल्हयाचे नाव.</td><td></td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | 4. जमिनीचा गट प्रकार.<br>5. जमिनीचा प्रकार – शेती / बिगर शेती<br>6. जमिनीचे क्षेत्रफळ. (हेक्टर आरमध्ये)<br>7. भविष्यात सदर जमिन कंपनी / फर्मला विक्री करण्यास सहमत असल्याचे जमीन मालकासोबत केलेले करारपत्र. (नोटराईज्ड), / साठेखत.<br>8. कंपनीने नियोजित कारखान्यासाठी जागा कंपनी / फर्मच्या नावे खरेदी केली असल्यास त्याबाबत अद्ययावत ७/१२ उतारा.<br>9. अर्जदाराचे पासपोर्ट आकाराचे फोटो. | |
| 6 | कंपनी / फर्मचे दस्तऐवज | |
| | 1. कंपनीचे Articles of Association, Memorandum of Association.<br>2. भागीदारी फर्मसंबंधात भागीदारी करार. | |
| 7 | नियोजित कारखाना स्थळाच्या परिसरातील (50 कि.मी. अंतरातील) अस्तीत्वात असलेल्या कारखान्याची माहिती. | |
| 8 | 50 कि.मी. अंतरातील यापूर्वी हवाई अंतर प्रमाणपत्र दिलेल्या परंतू प्रत्यक्षात न उभारलेल्या कारखान्यांची माहिती. | |
| 9 | कारखाना / प्रकल्पाच्या नियोजित स्थळासाठी यापूर्वी हवाई अंतर प्रमाणपत्र देण्यात | 1.<br>2.<br>3. |

| | | |
|---|---|---|
| | आलेल्या कंपन्यांची माहिती. तथापि, अद्याप उभारणीखाली असलेल्या / उभारणी सुरु न केलेल्या प्रकल्पांची माहिती. | |
| 10 | नियोजित साखर कारखान्यापासून २५ कि.मी. अंतरावर अस्तित्वात कारखान्याचा गुगुल नकाशा. | |
| 11 | नियोजित कारखाना, स्थळावर चिमणी उभारावयाच्या ठिकाणी पक्क्या बांधकामातील खांब (Pillar) ज्याचा आकार (६x१x१ फूट) असून खांब जमिनीच्या आतमध्ये ३ फूट व जमिनीच्या वर ३ फूट असला पाहीजेए खांबावर गावाचे नाव, सर्व्हे क्मांक/ गट क्रमांक ठळकपणे दर्शविलेला असावा. | |
| 12 | खांब उभारलेल्या जमिनीचा फोटो व ७/१२ उतारा | |

प्रस्तावासोबत मी सादर केलेले सर्व कागदपत्रे / माहिती / दस्तऐवज माझ्या माहिती व ज्ञानाप्रमाणे अचूक व खरी आहेत. नजीकच्या काळात यासंदर्भात काही प्रश्न उपस्थित झाल्यास त्यास मी / आमची कंपनी जबाबदार राहील.

प्राधिकृत अधिका-याची नाव व सही

स्थळ :
दिनांक :